I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 173-177
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# राष्ट्रीय हित राष्ट्रीय सुरक्षा

छाया किशनजी बडोले
राज्यशास्त्र विभाग डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author: cwalde549@gmail.com

| Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023<br>Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023 |
|---|---|---|

**सारांश** :– राष्ट्र ही एक आधुनिक राजकिय संकल्पना आहे. आपल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरांचे भान ठेवून त्या परंपरांचे सातत्य राजकिय दृष्टीन म्हणजे राज्याच्या चौकटीत टिकवून ठेवणारा आणि विशिष्ट भौगोलिक प्रदेशनिष्ठा नात बाळगणारा लोकसमुह किंवा समाज म्हणजे 'राष्ट' असे म्हणता येईल.

''यालाच इंग्रजी भाषेत नेशन हा शब्द आहे. त्यामध्ये जन्म किंवा वंश समुळ अपेक्षित आहे.''

राष्ट्र निर्मितीसाठी वंशिक एकता, भौगोलिक एकता, धार्मिक एकता, ऐतिहासिक पृष्ठभूमी आणि भाषा यांची आवश्यकता असली तरी सर्वाच्याच बाबतीत समाजाची एकवाक्यता असेलच असे नाही. भिन्नभिन्न परिस्थिती असतांनाही राष्ट्र निर्मिती होऊ शकते. राष्ट्राचे राष्ट्रियत्व त्या–त्या राष्ट्रामध्ये जन्मास येण्यास प्रत्येकास मिळते. कायदेशीर दृष्टया राष्ट्रीयत्व म्हणजे त्या–त्या राष्ट्राचे नागरिकत्व होय. मात्र राजकीय दृष्टया व्यक्तीचे राष्ट्रीयत्व म्हणजे त्या व्यक्तींचा सांस्कृतिक धार्मिक किंवा वंशिक वारसा होय. राष्ट्र विकासातील दोन महत्वाचे आधारस्तंभ म्हणून राष्ट्रीय हित आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचा विचार होणे गरजेचे असते.

१) ''राष्ट्रीय हित म्हणजे एखादया राष्ट्रद्वारे सैध्दांतिक दृष्टया निश्चित केलेले ध्येय होय.''

२) राष्ट्रीय हिताची व्याख्या करतांना पेडलफोर्ड आणि लिंकन म्हणतात ''राष्ट्रीय हिताची संकल्पना समाजाचा मुलभूत मुल्यांशी संबंधित आहे. ते मुल्य म्हणजे राष्ट्राचे कल्याण त्याच्या राजकिय विश्वासांचे संरक्षण राष्ट्रीय जीवन पध्दती प्रादेशिक अखंडता आणि सीमांची सुरक्षितता''

**बीजसंज्ञा** :–राष्ट्रीय हित, राष्ट्रीय सुरक्षा, सार्वमत सुरक्षा, राजकीय सुरक्षा, आर्थिक सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, पर्यावरणीय सुरक्षा.

---

**प्रस्तावना** :

राष्ट्र ही एक आधुनिक संकल्पना आहे. राष्ट्रीय हितसंबंधाचे वैचारिक, नैतिक, वैधानिक, वास्तवादी , नोकरशाही, वांशिक, समाजस्तरीय,परावलंबी आणि जागतिक हितसंबंधाचे आधार निर्माण झालेले आहेत. या निरनिराळया आधारावरून हितसंबंधाचे स्वरूपही बदलत बदलत्या राजनीतिच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये सुरक्षिततेचे प्रश्न जाणून घेणे अतिशय महत्वाचे आहे.

अण्वस्त्रांमुळे तर सुरक्षिततेची व्यापकता जागतिक स्वरूपाची झालेली आहे. म्हणजे अण्वस्त्रामुळे राष्ट्रांचा प्रशन हा वैयक्तिक नाही तर तो संपूर्ण जगाच्या सुरक्षेचाही प्रश्न आहे. त्याशिवाय मानवतेच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा राष्ट्रीयहिताच्या दृष्टीने एक नविन प्रश्न आहे.

विचारांती व अनुभवातून संरक्षणविषयक करार होत आहेत. अर्थात त्या करारांमध्ये निशस्त्रीकरण करार शस्त्रनियंत्रण करार, अण्वस्त्र प्रचार बंदी, तटस्थता धोरण इत्यादींचा

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 173-177
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

समावेश असला तरी सुरक्षिततेचे महत्व कुणीही नाकारलेले नाही.

**अर्थ :-**

राष्ट्राचे राष्ट्रीयत्व त्या-त्या राष्ट्रांमध्ये जन्मास येणा-या प्रत्येकास मिळते. कायदेशीर दृष्टया राष्ट्रीयत्व म्हणजे त्या-त्या राष्ट्राचे नागरिकत्व होय. मात्र राजकीय दृष्टया व्यक्तीचे राष्ट्रीयत्व म्हणजे त्य व्यक्तीचा सांस्कृतिक, धार्मिक किंवा वांशिक वारसा होय.

अनादी काळापासून राष्ट्रहिताची संकल्पना साकार झालेली आहे. त्या राष्ट्रीय हिताच्या स्वरूपात कमी अधिक फरक झालेला आढळतो. 'स्वामींची इच्छा' 'राजाची इचछा''श्री ची इच्छा' किंवा राजवंशाचा हित संबंध इ. शब्द प्रारंभापासूनच राष्ट्रीय हितसंबंधाच्या संदर्भात उपयोगात येत आहेत.

**व्याख्या :-**

१. ''राष्ट्रीय हित म्हणजे एखादया राष्ट्राद्वारे सैध्दांतिक दृष्टया निश्चित केलेले ध्येय होय.''

२. राष्ट्रीय हिताची व्याख्या करतांना **पेडलफोर्ड आणि लिंकन** म्हणतात, '' राष्ट्रीय हिताची संकल्पना समाजाच्या मुलभूत मुल्यांशी संबंधित आहे. ते मूल्य म्हणजे राष्ट्राचे क्लण त्याच्या राजकीय विश्वासांचे संरक्षण, राष्ट्रीय जीवन पध्दती प्रादेशिक अखंडता आणि सीमांची सुरक्षितता''

३. **चार्लस लर्च व अब्दुल सैद** , '' दीर्घकालीन आणि सर्वसाधारण ध्येय साध्य करण्यासाठी राष्ट्रराज्य आणि सरकार जी कृती करतात. तिला राष्ट्रहितसंबंध म्हणतात''


४. **जोसेफ फ्रॅंकल** , '' राष्ट्रीय हित हा परराष्ट्र धोरणाचा मूलभूत सिध्दांत

५. **व्हरनॉन वान डायक** , '' राष्ट्रीय हित म्हणजे असे धोरण की जे इतर राज्यासोबत संबंध प्रस्थापित करण्यासाठी किंवा रक्षणासाठी प्रयत्नशिल असते''

**व्याप्ती आणि संकल्पना**

राष्ट्रीय हित परराष्ट्रीय धोरणास वातारणाधिष्ठित दृष्टिकोन प्रदान करीत असते. कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण हे त्या देशाच्या हितसंबंधावर आधारिकत असते.

राष्ट्रीय हिताचा आणि अन्य राष्ट्रांच्या संबंधिकत घटनांची संबंध असू शकतो. मार्गेन्यांच्या विचारानुसार, राष्ट्रीय हितसंबंध हे त्या होत्या. त्या राष्ट्राच्या क्षमतेशी प्रमाणबध्द असावेत तसे ते असतात राष्ट्रीय हिताबद्दलच्या अनेक कल्पना स्पष्ट नाहीत.




आजच्या युगामध्ये राष्ट्रीय हिताचा संबंध आंतरराष्ट्रीय हिताशी जोडल्या जातो हि कल्पना काही नवीन नाही. कौटिल्याने परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हित यांचा मेळ घालतांना संबंध स्पष्ट केलेलो आहे. कौटिल्याने राजमंडळाची कल्पना तशी स्पष्ट पामर आणि पार्किन्सच्या विचारानुसार वृध्दी होत असते. राष्ट्रहिताच्या

व्याप्तीमध्ये राजनय डावपेच, अफवा, राजकीय युध्द, आर्थिक साधने, साम्राजयवाद, वसाहतवाद, युध्द इ.

**राष्ट्रीय हिताचे कार्ये :-**

१.परराष्ट्र धोरणास वातावरणाधिष्ठित दृष्टिकोन देणे.

२.परराष्ट्र धोरणातील दिर्घ मुदतीच्या किंवा अल्प मुदतीच्या प्रयत्नाबाबत मार्गदर्शन

३.राष्ट्राचे तत्कालीन हित अनपेक्षित हि साध्य करण्याबाबत धोरण निर्धारकास सतत मार्गदर्शन करणे.

४.राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व जोपासणे.

५.आर्थिक विकासासाठी व्यापारी सुविधा प्राप्त करणे

६.राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करो.

७.आंतरराष्ट्रीय कायदयाचा विकास करणे तसेच संघटना यशस्वी करणे

८.राष्ट्रीय सीमाचे संरक्षण करणे.

९.देशाची एकात्मता जोपासणे.

**राष्ट्रहिताचे प्रकार**

१.प्राथमिक हित

२.दुय्यम हित

३.चिरस्थायी हित

४.बदलते हित

५.सामान्य हित

६.विशिष्ट हित

**१. राष्ट्रीय सुरक्षा**

आज जगामध्ये राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न हे राष्ट्रीय जीवनाचे एक अंग बनले आहे. कुठल्याही देशाची राष्ट्रीय सुरक्षा हि त्या देशाच्या सुध्दा सामाजिक आणि आर्थिक आधारावरच अवलंबून असते. ब-याच वेळा राष्ट्रीय संरक्षण आणि 'राष्ट्रीय सुरक्षा' हे दोन्ही शब्द प्रयोग समानार्थी म्हणून वापरले जातात. परंतू प्रत्यक्षात या दोन्ही शब्दांचा अर्थ मात्र भिन्न आहे.

आदर्श राष्ट्रीय सुरक्षितता निर्माण करतांना त्या संदर्भातील धोरणेसुध्दा आदर्श असणे जरूरीचे ठरते. उदा. भारताने जागतिक स्पर्धेमध्ये आपली अस्मिता टिकविण्यासाठी वेळ प्रसंगी सुरक्षितता सांभाळण्यासाठी 'अणू' प्रगती केली. हया सदर्भामध्ये भारताने १९७३ मधील राजस्थानच्या पोरखन येथे अणूचाचणी घेतली.

राष्ट्रीय हित साधझयासाठी जे-जे प्रयत्न केले जातात ते सर्व प्रयत्न सुरक्षेच्या मार्गाशी संबंधित असतात. संरक्षणास आणि सुरक्षेच्या संदर्भात स्पष्टीकरण करतांना डॉ. लेफ्टकर्नल अभ्यंकर यांनी स्पष्ट केले ाि, संरक्षण प्रश्नांची चर्चा करतांना पुष्कळ वेळा 'राष्ट्रीय संरक्षण' (छंजपवदंस क्मिमदबम) आणि राष्ट्रीय -सुरक्षा ( छंजपवदंस ेमबनतपजल) असे शब्दप्रयोग वापरले जातात. हे दोंन्ही शब्दप्रयोग समानार्थी असले तरी प्रत्यक्ष वापरात वा प्रत्यक्ष शब्दप्रयोग काही एक विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला आहे.

**२. सार्वमत सुरक्षा (सर्वकष सुरक्षा)**

सुरक्षेच्या निनिराळया प्रकारांपैकी सर्वकष सुरक्षा एका विशाल दृष्टीकोनातून निर्माण झालेली संकल्पना आहे. या विश्वव्यापी संकल्पनेचा संबंध शांततेने जिवन जगण्याशी

आहे. शांतता हवी असेल तर युध्द समजून घेतले पाहिजे असे म्हटले जाते. सुरक्षेच्या पारंपारिक पध्दती आणि मानवी विकासाचे प्रश्न एकाच वेळी एकामागोमाग एक सोडविणे शक्य आहे. सार्वमत सुरक्षेच्या सुंदर्भातील अभ्यास हा प्रामुख्याने पुढील चार भागात करणे योग्य ठरेल.

**१. राजकीय सुरक्षा**

**२.आर्थिक सुरक्षा**

**३.सामाजिक सुरक्ष**

**४.पर्यावणीय सुरक्षा**

**३.राजकीय सुरक्षा**

राजकीय सुरक्षेच्या संदर्भातील अभ्यासाला मर्यादा नाहीत. राजकीय सुरक्षा ही पूर्णपणे राजकीय संघटनांशी आहे. ज्या निरनिराळया संस्था किंवा संघटना वेळोवळी आव्हान करतात. त्या आव्हानाविरूध्द सार्वमत सुरक्षा घटक म्हणून राष्ट्रीय संस्थाना विश्वासात घेउन,शिस्त निर्माण करून, नियंत्रणे लादून सुरक्षात्मक हालचाली करणे शक्य होत असते. भारत पाकिस्तानच्या संदर्भात विचार केला तर काश्मीर संदर्भातील प्रश्न आणि सीमा सुरक्षा प्रश्न पारंपारिक प्रश्न झालेले आहेत. तया प्रश्नांवर काही तोडगे काढुन शांतता व्यवस्था निर्माण करता येउ शकते.

**४.आर्थिक सुरक्षा**

राष्ट्राराष्ट्रातील संघर्षाची पाळेमुळे आर्थिक शक्तीशी संबंधित असतात. सामानयपणे सुदृढ अर्थव्यवस्थेमध्ये सुरक्षा शक्तीसुध्दा अधिक चांगल्या प्रकारात आढळते. राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये महत्वाचा भाग बाजारपेठेचा असतो. मालाच्या देवाण-घेवाणामधूनच विकास कार्य पूर्ण होत असते. आर्थिक विकासाच्या संदर्भात राष्ट्राराष्ट्रातील व्यापारही महत्वाचा असतो. व्यापारावर अनेक निर्बंध नियंत्रणे असतात. व्यापारावरील नियंत्रणे शिथील केलेली असते.

व्यापाराच्या मार्गातील अडथळे दूर केलीत किंवा कमी केली तर आर्थिक सुरक्षितता सांभाळणे शक्य होते. आर्थिक व्यवहारामध्ये भाडेसुध्दा एक महत्वाचा घटक आहे. ते भाडे स्थिर करण्यात आले. किंवा कमी करण्यात आले तर अनेक मार्ग मोकळे होतात. व त्या सर्वामधूनच सार्वमत सुरक्षेचा विचार जोर धरू लागतो.

**५. सामाजिक सुरक्षा :-**

सामाजिक किंवा संस्थात्मक सुरक्षेचा संदर्भात लोकसंख्या तिचे प्रश्न महत्वाचे असतात. राष्ट्र विकासामध्ये आणि सर्वकष सुरक्षेमध्ये लोकशक्ती महत्वाची असते. अतिरिक्त लोकसंख्या अनेक प्रकारच्या प्रश्नांना जन्म देते. त्यामुळे त्या लोकसंख्येचे स्थलांतर होणेसुध्दा आवश्यक असते.

शेजारच्या प्रदेशातून आलेले निर्वासित सामाजिक सुरक्षेसाठी निश्चितपणे अडथळयाची कार्यवाही करतात. निर्वासितातील संकुचित भावना सुरक्षेला बाधक ठरते. लोक संस्थेतील सर्वच लोक देशाच्या शक्तीमध्ये उपयोगी ठरतीलच असे नाही. देशाचया विकासाठी निरनिराळया प्रकारचया योजना राबविल्या जातात त्या नागरी सामाजिक योजनेमध्ये

सहभागी न होणे हे सुध्दा सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असते.

**६.पर्यावरणीय सुरक्षा :-**

पर्यावरण संतुलनाशी मानवी सुरक्षा निगडित आहे. पर्यावरणातील घटक जोपर्यंत व्यवस्थिती कार्यशील आहेत. तो पर्यंत मानवी जिवनास धोका संभवत नाही. मानवी जीवनासाठी अन्न,वस्त्र, निवारा हया मूलभूत गरजा असल्या तरी हवा,पाणी,अर्जा हया अत्यावश्यक गरजा आहेत. पर्यावरणाची सुरक्षा सांभाळली गेली तर सर्वकष सुरक्षा निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

मानवी सुरक्षेसाठी आणि विकासासाठी संसाधनांची आवश्यकत असते. मानवी जीवनास स्वच्छ हवा,पाणी अत्यंत अत्यावश्यक असल्याने त्या संसाधनांचा सुरक्षेचा दृष्टीने विचार होणे महात्वाचे आहे. अरबस्तान महागडया तेलाचे , पेट्रोलचे भंडार विहीरी आहेत. पण स्वच्छ पाणी , हवा यांची उणीव आहे. त्यामुळे अरबस्तानला आपली सुरक्षा सांभाळणे कठीण झालेले आहे.

शहरी भागांमध्ये वाढत्या कारखानदारीतून होणारे प्रदुषण स्वच्छ पाणी हवेचा अभाव यामुळे पर्यावणीय सुरक्षा धोक्यात आलेली दिसते. पुरेशी वनस्पती लागवड प्रदुषद नियंत्रण समयसुचकता आणि सावधानता या दृष्टीने पर्यावरणीय सुरक्षा सांभाळून सर्वकष सुरक्षा जोपासण्यास मदत होते.

**संदर्भ :-**

प्रा. ए.पी. चौधी/सौ. अर्चना चौधरी -भारताची राष्ट्रीय सुरक्षा श्री रंगराव पाटील जळगाव -२००३

प्रा.रा.ज. लोटे-भारतातील स्थानीक स्वशासन -पिंपळापुरे ॲण्ड कं. पबिशर्स नागपूर-२०१४

डॉ. प्रदिप आगलावे-ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र ललिता पुराणिक-साईनाथ प्रकाशन-२००२